(9)

(२)

तातडीचे
=======

जा.क्र.माध्य-३[१४]/नमाशा/मान्यता/पुणे/९२-९३.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १. यांचे कार्यालय.
दिनांक :- १६/ ३ /१९९३.

18 MAR 1993

प्रति,

सचिव,
भोर वेल्हे तालुका
औद्योगिक विकास मंडळ, भोर [राजगड ज्ञानपिठ]
जि.पुणे.

विषय :- सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.......

संदर्भ :-शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे पत्र क्र.एसएसएन/१०९२/३३२०/माशि-१ दि.२२/२/१९९३.

शासनाने संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदिला अपवाद करुन खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९२ पासून विना अनुदान तत्वावर / कायम विनाअनुदान तत्वावर " विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यांत येत आहे.

[१] या नवीन माध्यमिक शाळांना [ इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त ] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएसएन १०८८/१६६९-एन माशि-१. दिनांक १०/२/८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सूत्रानुसार अनुदान अनुदेय होईल.

[२] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

[३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

[४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी.] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमी पत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

Recd on 26/3/93

TRUE COPY

Headmaster
Appasaheb Bandal Vidyalaya
Aalande, Tal. Bhor, Dist. Pune

मुख्याध्यापक
अप्पासाहेब बांदल विद्यालय
आळंदे,ता भोर जि.पुणे

.........२/-

[५] जादा उघाडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याचे देण्यात यावेत तसेच प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्याकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

[६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [ प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्याकडून जमा करण्यात येवू नये.

[७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [ सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

[८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

[९] शिक्षक/कर्मचारी संख्या शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांचेकडून मंजूर करुन घेण्यात येईल.

[१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्यावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

[११] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधा सुविधासह ठेवण्यात येतील.

[१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी :-
=======

[१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

[४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

[५] संबंधित संस्थेने कायमस्वरुपी ठेव म्हणून ५०,०००/- [ रुपये पन्नास हजार फक्त] अनामत रक्कम चलनाव्दारे शासकीय कोषागारात लेखाशिर्ष " ०२०२ शिक्षण

........3/-

TRUE COPY
Headmaster
Appasaheb Bandal Vidyalaya
Aalande, Tal. Bhor, Dist. Pune

क्रीडा, कला व संस्कृती ०-१- सर्वसाधारण शिक्षण " २०२ - माध्यमिक शिक्षण [ संकेत क्र. ०२०२००२६] शिक्षण व इतर फी [०२] शिक्षण फी व इतर फी खाली भरावे. [ केवळ इंग्रजी माध्यम शाळांकरिता.]

वरील बाबी पैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.नं. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | भोरे वेल्हे तालुका औद्योगिक विकास मंडळ, भोर, [राजगड ज्ञानपिठ] | आळंदे ता.भोर. | आठवी जून १९९२. | मराठी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहीत प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाचे प्रथम मान्यतेकरीता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या. विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहीत केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

स्थळप्रत ... यांची
सही असे

प्रतिलिपी.

१] शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद पुणे. यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.
त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झालेअसल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ३२.

३] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीसाठी सादर.

एस्.एन्.खराडे. ११३१९९३.

TRUE COPY

Headmaster
Appasaheb Bandal Vidyalaya
Aalande, Tal. Bhor, Dist. Pune

मुख्याध्यापक
आप्पासाहेब बांदल विद्यालय
आळंदे, ता भोर जि. पुणे